# ‘बुकगंगा’तर्फे ऑनलाइन विश्व कविसंमेलन

प्रतिनिधी, पुणे

---

**आता जगभरातील** नवोदित मराठी कवींना आपल्या कविता सादर करण्यासाठी आता ‘ई-व्यासपीठ’ मिळणार आहे. ‘बुकगंगा डॉट कॉम’तर्फे ऑनलाइन विश्व कविसंमेलन भरवण्यात येणार आहे. अकरा दिवस चालणाऱ्या या कविसंमेलनात जगभरातील कवी बुकगंगाच्या फेसबुक पानावर आपल्या कविता ‘पोस्ट’ करू शकतील. इतकेच नव्हे तर सासवडमधील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात संकेतस्थळातर्फे भरवण्यात येणाऱ्या प्रदर्शनकक्षात या कविता प्रदर्शितही करण्यात येतील. ‘मायविश्व कॉर्पोरेशन’ आणि बुकगंगाचे संस्थापक मंदार जोगळेकर यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. या कविसंमेलनात भाग घेणाऱ्या सर्वोत्कृष्ट कवितांना संकेतस्थळातर्फे पुरस्कारही देण्यात येणार आहेत. संमेलनातील प्रथम क्रमांकाच्या कवितेस ३००१ रुपये, द्वितीय क्रमांकास २००१ रुपयांचा आणि तृतीय क्रमांकाला १००१ रुपयांचे पुरस्कार गिफ्ट कूपनच्या स्वरूपात देण्यात येणार आहेत. तसेच पाच उत्तेजनार्थ पुरस्कारही देण्यात येणार आहेत.